वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

पुणे पोलीस

PUNE CITY TRAFFIC POLICE पुणे शहर वाहतूक पोलिस

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./१३६८/२०२४ दिनांक १९ /०२/२०२४

## प्रेसनोट

गणेशखिंड रोडवर पुणे विद्यापीठ चौकामध्ये उड्डाणपूल व मेट्रो पिलरचे काम चालु आहे. त्यामुळे दोन्ही बाजुचा रस्ता अरुंद झालेला आहे. पुणे विद्यापीठ चौकामधील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी गणेशखिंड रोडवरुन वाहतूक करणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या पुणे स्टेशन ते मुंबई व ठाणे दरम्यान चालणाऱ्या शिवनेरी बसेसच्या मार्गामध्ये व वेळेमध्ये बदल करणे गरजेचे आहे.

याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर **गणेशखिंड रस्त्यावरुन वाहतूक करणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या शिवनेरी बसेसच्या मार्गात व वेळेत दि. २०/०२/२०२४ रोजीपासून प्रायोगीक तत्वावर पुढील आदेशापर्यंत सकाळी ०८:०० ते २२:३० वा. दरम्यान** तात्पुरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

- ➢ गणेशखिंड रोडवरील उड्डाणपुल व मेट्रोचे बांधकाम पुर्ण होईपर्यंत पुणे शहरातुन सिमला ऑफिस चौकामधून गणेशखिंड रोडने पुणे विद्यापीठ चौक, औंध मार्गे मुंबई, ठाणे कडे जाणाऱ्या व येणाऱ्या बसेसना दि. २०/०२/२०२४ रोजी पासून सकाळी ०८.०० ते २२.३० वा. पर्यंत प्रवेश बंद राहिल.
- ✓ **पर्यायी मार्ग** :- गणेशखिंड रोडवरील रेंजहिल्स कॉर्नर येथून उजवीकडे वळण घेवून रेंजहिल्स रोडने साई चौक, आंबेडकर चौक, खडकी मार्गे ब्रेमेन चौक येथून औध रोडने मुंबई, ठाणे कडे जातील. व परत येताना वरील मार्गानेच गणेशखिंड रोडला येतील.

Borate 19.2.24

( शशिकांत बोराटे )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**